मुख्य कार्यालय, विरार(पूर्व)
ता.वसई, जि.पालघर, पिन-४०१३०५.
ई-मेल:vasaivirarcorporation@yahoo.com
ता.वसई जि.पालघर४०१ ३०५

अग्निशमन व आणीबाणी सेवा
मुख्यालय आचोळे, वसई (पुर्व)
भ्रमणध्वनी क्र.९८२२३२१६८४
ता.वसई जि.पालघर४०१ २०९
ई-मेल : fire.vvmc@gov.in
जा.क्र. व.वि.श.म./अग्नि/मु.का./३३९५/२०२३
दिनांक :१५/०२/२०२३

# ना हरकत दाखला

प्रति,
Ms. Shurparaka Education & Medical Trust's
M.B. Harris College Of Arts & A.E. Kalsekar
College Of Commerce & Management,
नवायत नगर, सोपारा गांव, नालासोपारा(प)
ता.वसई जि.पालघर.

**संदर्भ:-** १) Ms. Shurparaka Education & Medical Trust's यांचा दि.११/०२/२०२३ रोजीचा अर्ज.
२) नोंदणीकृत अनुज्ञप्तीधारक अभिकरणाकडून प्राप्त झालेला दाखला .
३) उपलब्ध अग्निशमन यंत्रणेचे फोटो.
४) टॅक्स पावती.
५) व्यवसायाच्या ठिकाणाचा नकाशा
६) अग्निशमन विभागाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी दि.०७/०२/२०२३.

अग्निशमन विभागात सादर केलेल्या अर्जानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेचे कार्यक्षेत्रातील " Ms. Shurparaka Education & Medical Trust's " या शाळेच्या ठिकाणी करावयाची अग्निसुरक्षा व्यवस्था व सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाच्या खबरदारीचे अनुषंगाने अग्निशमन यंत्रणेची तपासणी करुन या विभागाच्या खालील शर्ती व अटींची पूर्तता करण्याचे अधिन राहून केवळ दिलेल्या तारखेपासून फक्त ३१/१२/२०२३ या कालावधीसाठी अग्निशमन तांत्रिक अभिप्राय देण्यात येत असुन तद्नंतर नुतनीकरण करणे बंधनकारक राहील.

"महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अंन्वये अधिनियमाच्या कलम ३ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे इमारतीमधील आग प्रतिबंधक जीवसंरक्षक उपाययोजना सदैव कार्यान्वीत ठेवणे आपणास बंधनकारक आहे. कलम ३ (३) नुसार सदर यंत्रना कार्यक्षम असले बाबत वर्षातुन दोनदा जानेवारी व जुलै महिन्यात लायसंन्सप्राप्त अभिकरणाकडून तपासणी करुन, तसे प्रमाणपत्र अग्निशमन विभागाकडे सादर करणे बंधन कारक आहे .

१. शाळेच्या इमारतीत जीना, पॅसेज इत्यादी भाग जसे आता मोकळे आहेत. तसे ते कायम स्वरुपी मोकळे राहतील याची दक्षता घ्यावी
२. शाळेच्या बाहेर पडण्याचे मार्ग चिन्हाने दर्शविण्यात आलेले आहेत तसे ते कायम स्वरुपी दिसतील याची खबरदारी घ्यावी.
३. शाळेच्या सद्या करण्यात आलेली विद्युत व्यवस्था जशी आता सुस्थितीत आहे तशी ती सदैव सुस्थितीत राहील याची खबरदारी घेण्यात यावी.
४. शाळेत आवश्यकतेनुसार अधिक विद्युत व्यवस्था करावयाची असल्यास ती स्पार्कप्रुफ व आपोआप खंडीत होणारी असावी व ती आय.एस.आय मार्क प्रमाणित साहित्याने परिपुर्ण असावी. तसेच मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून करुन घेऊन ती पूर्णत: सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र घ्यावे.
५. शाळेच्या ठिकाणी ए.बी.सी टाईप (०४ की.) ०४ नग व बारीक वाळुने भरलेल्या बादल्या ठेवण्यात आलेले आहेत ते सदैव कार्यान्वित ठेवणे तसेच कालानुरुप रिफिलिंग करणे व कार्यक्षम ठेवणे आपणांस बंधनकारक आहे.

६. शाळेतील संबंधित व्यक्ती, कर्मचारी अथवा स्वयंसेवक यांना आग विझविणे, रुग्णांना त्वरीत व सुरक्षितपणे बाहेर काढणे, अग्निशमन उपकरणांचा वापर याबाबत किमान प्राथमिक माहिती असावी. वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात यावे.महिन्यातुन एकदा मॉक ड्रिल घेण्यात यावी व त्याच्या नोंदी जतन कराव्यात.

७. इमारतीत सध्या असलेली पुरेशी वायुव्हिजन व्यवस्था (व्हेंन्टीलेशन) व पर्यायी पोर्टेबल इमरजंन्सी लाईटची व्यवस्था कायम स्वरुपी उपलब्ध राहील याकडे काटेकोरपणे लक्ष देणे बंधनकारक आहे.

८. **शाळेच्या इमारतीमध्ये अत्यावश्यक सेवेचे दुरध्वनी क्रमांक जसे फायर ब्रिगेड, पोलीस, दवाखाना इत्यादींचे ठळक अक्षरात दर्शनी भागात दर्शविण्यात आले आहेत ते कायमस्वरुपी दिसतील असे पहावे.**

९. प्रत्येक मजल्यावर असलेली हस्तचलीत इलेक्ट्रिक भयसूचना यंत्रणा सदैव कार्यान्वित ठेवावी.

१०. इमारतीमधील अग्निसुरक्षा व्यवस्था यंत्रणेची स्थिती केव्हाही तपासणी करण्याचे अधिकार संबंधित अग्निशमन अधिकारी यांचेकडे राहतील.

११. शाळेतील कार्यरत सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी, नोंदनीकृत अनुज्ञप्तिधारक व अग्निशमन कर्मचारी यांचे मदतीने वर्षातुन किमान एक मॉक ड्रिल करुन घेणे बंधनकारक राहील.

१२. वसई-विरार शहर महानगरपालीकेचे अनधिकृत बांधकाम कारवाईस बाधा न येता फक्त अग्निशमन बाबींसाठी ना हरकत दाखला / अभिप्राय देण्यात येत आहे.

१३. नविन बांधकामासाठी वापर परवाना घणेपूर्वी कॅपीटेशन फी / कर भरणे बंधनकारक आहे.

१४. प्रत्यक्ष व्यवसाय सुरु करणेपूर्वी सर्व प्रकारच्या शासकीय, निमशासकीय व इतर परवानग्या संबंधित कार्यालयाकडून घेण्यात याव्यात. हा ना हरकत दाखला/ अभिप्राय कुठल्याही प्रकारचा पुरावा म्हणून वापरण्यात येऊ नये. असे केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

१५. शाळेत कुठल्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास, सर्व प्रकारचे तक्रारींचे निरसन (खुलासा) करण्याची जबाबदारी अर्जदार व्यावसायिकांवर राहील,याबाबत अग्निशमन विभाग जबाबदार राहणार नाही.

१६. ना हरकत दाखल्याचे नुतनीकरण वेळोवेळी शासन निर्णयांत होणारे बदल व फी वाढ भरणा बंधनकारक राहील.

१७. सदरहू अग्निशमन तांत्रिक अभिप्राय निर्गमीत केल्याच्या दिनांकापासून ३१/१२/२०२३ कालावधीसाठी वैध राहील. तद्नंतर अग्निशमन तांत्रिक अभिप्राय नुतनीकरण करताना त्या त्या वेळी अस्तीत्वात असलेली अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित ठेवणे आपणांवर बंधनकारक असेल. तसेच या संदर्भाने जर काही दुर्घटना घडल्यास त्यास सर्वस्वी मालक / भोगवटादार जबाबदार राहील.

१८. सदर ना हरकत दाखल्याची मुदत संपण्यापूर्वी किमान एक महिना आधी आपण दाखला नुतणीकरण करणेसाठी अर्ज कागदपत्रांसह इकडील कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.दाखल्याची मुदत संपल्यानंतर सदर दाखला रद्द झाला आहे असे मानन्यात येईल.

१९. जर काही दूर्घटना घडुन वित्त वा जिवीत हानी झाल्यास त्या संदर्भात आपणांवर फौजदारी गुन्हा दाखल होण्यास आपण पात्र असाल याची नोंद घेण्यात यावी.

२०. दाखला फी रु.५०००/- पावती क्रमांक. ६८९४८, पुस्तक क्रमांक. ६९०, दिनांक ०८/०२/२०२३ रोजीचा भरणा.

२१. मालक / भोगवटादार यांनी दरवर्षी जानेवारी व जुलै महिन्यात लायसन्स प्राप्त अभिकरणाकडून अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत कार्यरत असले बाबत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.यासाठी आपनास वेगळे मागणी पत्रक देण्यात येणार नाही याची नोंद घेण्यात यावी .

२२. नोंदणीकृत अनुज्ञप्तिधारकांची यादी www.maharashtrafireservice.org किंवा www.mfsindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**